धक्का!! सुराज्य सोलापूर

मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर २०२४ । पान १२

# माळशिरससाठी सातपुतेंच्या ‘राम’वर भरोसा

## विकास कामांच्या जोरावर पुन्हा आखाड्यात



✔ सोलापूर/प्रतिनिधी

**उमदेवारीच्या विलंबामुळं लक्षवेधी ठरलेल्या माळशिस विधानसभा मतदार संघामधील महायुती पर्यायानं भाजप उमदेवाराच्या चर्चेला अखेर पूर्ण विराम मिळाला आहे. या मतदार संघासाठी निवडून येण्याच्या सक्षमतेच्या कसोटीवर विद्ममान आमदार राम सातपुते यांच्यावर भाजपनं भरोसा ठेवत, त्यांच्या उमेदवारीवर अखेर शिक्कामोर्तब केलं आहे. गेल्या साडेचार-पाच वर्षात केंद्र आणि राज्य सरकारकडून खेचून आणलेल्या कोट्यवधी रुपयांच्या विकास कामांच्या जोरावर तसंच पुढील पाच वर्षाचं विकासाचं व्हिजन पूर्ण करण्याच्या अनुषंगानं, आमदार राम सातपुते हे इथल्या मतदारसंघातून पुन्हा विधानसभेची निवडणूक लढवणार आहेत. राष्ट्रवादी शरदचंद्र गटाचे उमेदवार उत्तम जानकर यांच्या विरुद्ध आमदार राम सातपुते टक्कर देणार आहेत.**

भाजपनं आपल्या उमेदवारांची यादी सोमवार (ता.२८) प्रसिद्ध केली. त्यामध्ये माळशिरस मतदार संघाच्या नावाचा समावेश आहे. या यादीत आमदार सातपुते यांचे नाव समाविष्ठ आहे. मंगळवारी (ता.२९) सातपुते त्यांचा उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णयाधिकाऱ्यकाडे सादर करतील.

विधानसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर करण्यात महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या भाजपनं सर्वात आघाडी घेतली. टप्याटप्यानं याद्या जाहीर करण्याचा या पक्षाचा ‘सिलसिला’ सुरुच होता.मात्र जाहीर होत असलेल्या पहिल्या काही याद्यांमध्ये आमदार सातपुते यांचं नाव येत नव्हतं. तेव्हापासून माळशिरसच्या उमेदवारीसंबंधी प्रचंड औत्सुक्य दिवसेंदिवस वाढत गेलं. आमदार सातपुते यांना उमेदवारी मिळणार की नाही, याबद्दल तर्कवितर्क आणि अंदाज यांना उधाण आले होते. शेवटी भाजपच्या रविवारी घोषित यादीत आमदार सातपुते यांचं नाव आलं आणि जल्लोषही साजरा झाला.

महत्वाचे म्हणजे लोकसभा निवडणुकीपासून सुरू झालेला मोहिते पाटील-सातपुते यांच्या राजकीय संघर्षाचा दुसरा अध्याय विधानसभा निवडणुकीत पहायला मिळणार आहे. माळशिरस मतदारसंघातून महाविकास आघाडीतील पवार गटाकडून उत्तम जानकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. जानकर यांच्या पाठीशी या वेळी मोहिते-पाटील यांची ताकद असणार आहे. जानकरांची उमेदवारी दुसऱ्याच यादीत जाहीर झाली होती. जानकरांना कोण आव्हान देणार, याची उत्सुकता वाढली होती. कारण, भाजपच्या दोन यादीत माळशिरसचा उमेदवार जाहीर झालेला नव्हता. तिसऱ्या यादीत मात्र अपेक्षेनुसार राम सातपुते यांना पुन्हा एकदा माळशिरसच्या रिंगणात उतरवण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी घेतला आहे.

राम सातपुते हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू आहेत. पहिल्या पंचवार्षिक निवडणुकीत मोहिते पाटील यांच्या सहकार्याने ते अवघ्या पंधरा दिवसांत आमदार झाले होते. लोकसभा निवडणुकीत लोकसभा निवडणुकीत भाजपकडून राम सातपुते यांनी सोलापूर मतदारसंघातून निवडणूक लढवली. सोलापूर लोकसभेच्या मतदार संघात गेटकन उमेदवारी असण्याबरोबरच खासदार प्रणिती शिंदे यांच्यासारख्या सक्षम उमदेवाराशी आमदार सातपुते यांनी जोरदार टक्कर दिली.

आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसह भाजपमधील प्रदेश आणि राष्ट्रीय पातळीवरील नेतेमंडळींनी आमदार सातपुते यांच्या माळशिरसच्या लढण्यावर विश्वासाची मोहर उमटवीत त्यांना उमेदवारी दिली आहे.

### मोहिते-पाटील अन् जानकर शक्ती एकवल्या तरीही...

वास्तविक पाहता माळशिरस तालुक्यात लोकसभा निवडणुकीवेळी ३०-३५ वर्षांचं राजकीय हाडवैर संपवून मोहिते-पाटील आणि जानकर गट एकत्र आलं त्यांच्यात दिलजमाई झाली. विधानसभेच्या निवडणुकीलाही या मोठी शक्ती एकटवलेल्या आहेत. तालुक्यात दोघांची ताकद एकत्रीत झाली आहे. तरीपण बेडर कार्यकर्ता अशी ओळख असलेल्या आमदार सातपुते यांनी उत्तम जानकर यांच्याशी कुस्ती धरली आहे. माळशिरसच्या युद्धभूमीवर जानकर विरुद्ध सातपुते अशी जोरदार फाईट होणार आहे.

# मोहोळची उमेदवारी बदला!

## दोन शिष्टमंडळे पवारांना भेटली!

✔ मोहोळ-सोलापूर/प्रतिनिधी

महाविकास आघाडीचा मित्र पक्ष असलेल्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातर्फे माजी आमदार रमेश कदम यांच्या कन्या सिद्धी कदम यांना उमेदवारी जाहीर झाल्यापासून या मतदार संघात तर्कवितर्कांच्या चर्चेचं अक्षरश: धूमशान सुरु आहे. शरद पवार गटानं दिलेली उमेदवारी अजित पवार राष्ट्रवादी गटाचे उमेदवार आमदार यशवंत माने यांच्या विजयासाठीची पुरक उमेदवारी असल्याचा आरोप केला जात आहे. सिद्धी कदम यांची उमेदवारी रद्द करुन सक्षम चेहऱ्यास उमेदवारी देण्यासंबंधी सोमवारी (ता.२८) दोन वेगवेगळी शिष्टमंडळं शरद पवार यांच्या भेटीसाठी बारामतीत गेली होती. तथापि, शरद पवारांनी उमेदवारीबद्दल केवळ ऐकून घेतलं मात्र उमेदवार बदलण्यासंबंधी ठोस सांगितलं नाही, अशी माहिती समोर आली आहे.

दरम्यान, सिद्धी कदम यांची उमेदवारी तितकीशी टस्सल देणारी नसल्याचे मानत राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या पर्यायाने राजन पाटील गटाच्या समर्थकांमध्ये खुशीचं वातावरण असल्याचं दिसत आहे, तशा चर्चा या समर्थकांमध्ये सर्वत्र सुरु आहेत.

सिद्धी कदम यांची उमेदवारी रविवारी जाहीर झाल्यापासून तालुक्यातील शरद पवार गटाचं राजकारण ढवळून निघालं आहे. उमदेवारी नाकारण्यासंबंधी कालपासून मोठ्या हालचाली सुरु होत्या. मोहोळ तालुका संघर्ष समितीमधील दीपक गायकवाड यांच्यासह काही सदस्यांनी सोमवारी सकाळीच बारामती गाठली. राष्ट्रवादी शरद पवार गटानं दिलेल्या उमेदवारीस आमचा आक्षेप असून राजू खरे आणि संजय क्षीरसागर यांची नावे उमेदवारीत आघाडीवर असताना सिद्धी कदम या अत्यंत नवख्या उमेदवारास कशी काय उमेदवारी दिली? उमदेवारी बदलावी, अशी आग्रही मागणी या शिष्टमंडळानं केली.

तसेच शरद पवार राष्ट्रवादी गटाकडून उमेदवारी मिळविण्यासाठी पहिल्यापासून प्रयत्नशील असलेल्या संजय क्षीरसागर यांच्या शिष्टमंडळानं सायंकाळी बारामतीत पोचून गोविंद बागेत शरद पवार यांची भेट घेऊन उमेदवारीसाठी आग्रह धरला. त्यावेळी शरद पवारांनी तुमच्या उमेदवारीसाठी मंगळवारी (ता.२९) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याशी बोलू, असे उत्तर दिले. यावेळी क्षीरसागर यांनी सिद्धी कदम यांना दिलेल्या उमेदवारीवरुन शरद पवार गटाच्या या जागेला कसा धोका निर्माण झाला आहे? तालुक्यात काय परिस्थिती उद्भवली आहे, यासंबंधी शरद पवारांना माहिती दिली.

### उमेश पाटील प्रतिक्रिया न देण्याच्या भूमिकेत

मोहोळची उमेदवारी देण्यावरुन संघर्ष समितीमधील काही सदस्यांच्या शिष्टमंडळानं शरद पवारांची भेट घेतली त्यावेळी उमेश पाटील देखील उपस्थित होते. पवार यांची भेट घेऊन आल्यानंतर प्रसारमाध्यामांपुढे बोलणं उमेश पाटील यांनी टाळलं. एरव्ही प्रसारमाध्यमांपुढे बोलण्याची संधी न सोडणारे उमेश पाटील एका शब्दाने बोलले नाही.

# ‘मध्य’मधून चेतन नरोटे यांना काँग्रेसची उमेदवारी

✔ सोलापूर/प्रतिनिधी

खासदार प्रणिती शिंदे यांच्या हक्काच्या शहर मध्य या मतदारसंघांमध्ये शेवटी काँग्रेसने बाजी मारली असून या ठिकाणी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. नरोटे हे मंगळवार २९ ऑक्टोबर रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती मिळाली.



प्रणिती शिंदे या लोकसभेवर निवडून गेल्यांनतर या मतदार संघातून काँग्रेसचा उमेदवार कोण असणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. या मतदारसंघातून मुस्लिम समाज तसेच मोची समाजाने उमेदवारी देण्याची मागणी केली होती. मात्र त्या दोन्ही समाजाला डावलून काँग्रेसचे शिंदे कुटुंबियांचे विश्वासू समजले जाणाऱ्या चेतन नरोटे यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे आता शहर मध्य मध्ये बहुरंगी लढत होणार आहे. या मतदारसंघातून यापूर्वी एमआयएमकडून फारूक शाब्दी, भाजपकडून देवेंद्र कोठे, माकपकडून माजी आमदार आडम मास्तर यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. या तिन्ही उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्जही दाखल केले आहेत. आता काँग्रेसकडून शहराध्यक्ष चेतन नरोटे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. याशिवाय या मतदारसंघात मनसेकडून नागेश पासकंटी यांनाही उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे आता या मतदारसंघात बहुरंगी लढत होणार आहे. सामान्य कुटुंबातून चळवळीतून जनसामान्यांचा चेहरा म्हणून उदयास आलेले चेतन नरोटे यांना महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार जाहीर केल्याने काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### माकपची झाली निराशा

लोकसभा निवडणुकीत माकपने प्रणिती शिंदे यांना पाठिंबा दिला होता. त्यासाठी शहरमध्यची जागा माकपला सोडण्यात येईल असा दावा आडम मास्तर करत होते. मात्र आता त्यांची पुरती निराशा झाली आहे.

### मुस्लिम आणि मोची समाजाच्या भूमिकेकडे लक्ष

या मतदारसंघात काँग्रेसची व्होटट बँक असलेले मुस्लिम समाज आणि मोची समाज आणि आता काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दोन्ही समाजाने उमेदवारी न दिल्यास बंडखोरी करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे आता मंगळवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी दोन्ही समाजातील नेते भूमिका घेणार यावर या मतदारसंघातील जय-पराजयाचे गणित अवलंबून असणार आहे.

**शिंदे सेनेचे तिसरी यादी जाहीर**

# बार्शीतून राजा राऊत; करमाळ्यातून दिग्विजय बागल

✔ सोलापूर/प्रतिनिधी



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेचे तिसरी यादी जाहीर केली आहे. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातून बार्शी मतदारसंघातून राजेंद्र राऊत तर करमाळा मतदारसंघातून दिग्विजय बागल यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून उमेदवारांची तिसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. तिसऱ्या यादीत सेनेचे १३ उमेदवार जाहीर केले आहेत. दोन जागी मित्रपक्षांच्या उमेदवारांना पाठिंबा जाहीर केला आहे. विशेष बाब म्हणजे रावसाहेब दानवे यांच्या कन्या संजना जाधव, भाजपच्या शायना एनसी यांचं सेनेच्या तिसऱ्या यादीत आलं आहे. बार्शीचे अपक्ष आमदार राजेंद्र राऊत यांना देखील उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

### एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे उमेदवार

सिंदखेड राजा - शशिकांत खेडेकर, घनसावंगी- हिकमत उढाण, कन्नड- संजना जाधव, कल्याण ग्रामीण- राजेश मोरे, भांडूप पश्चिम- अशोक पाटील, मुंबादेवी- शायना एनसी, संगमनेर- अमोल खताळ, श्रीरामपूर - मल्हारी कांबळे, नेवासा- विठ्ठल लंघे पाटील, धाराशिव- अजित पिंगळे, करमाळा- दिग्विजय बागल, बार्शी- राजेंद्र राऊत, गुहागर- राजेश बेंडल, पाठिंबा- जनसुराज्य, हातकणंगले- अशोकराव माने, राजश्री शाहू विकास आघाडी शिरोळ- राजेंद्र यड्रावकर

# मोहोळमधून राजू खरे यांना उमेदवारी?

✔ सोलापूर/प्रतिनिधी



मोहोळ राखीव मतदारसंघात शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसकडून सिद्धी रमेश कदम यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. मात्र त्यांच्या उमेदवारीला प्रचंड विरोध झाल्यामुळे पवार गटाकडून देण्यात आलेला एबी फॉर्म रद्द करण्यात आल्याची माहिती मिळालेली आहे.

सिद्धी कदम यांच्याऐवजी उद्योजक राजू खरे यांना मोहोळमधून उमेदवारी देण्यात आल्याचे एक पत्र सोशल मीडियावर सोमवारी रात्री वायरल झाले आहे. त्यावर प्रदेशअध्यक्ष जयंत पाटील यांची स्वाक्षरी आहे. मोहोळ मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या नावे पाठलेल्या पत्रात सिद्धी कदम यांचे नावे अनावधनाने एबी फॉर्म वितरित करण्यात आलेला आहे. सदरचा फॉर्म रद्द समजण्यात यावा व राजू खरे यांच्या फॉर्मची नोंद करण्यात यावी, असा स्पष्ट उल्लेख या पत्रात करण्यात आला आहे.

## नाना पटोलेंची गाडी धरली रोखून

✔ गोंदिया : गोंदिया जिल्ह्यातील मोरगाव अर्जुनी विधानसभेत काँग्रेसने तिरोड्याचे माजी आमदार दिलीप बनसोड यांना उमेदवारी दिली आहे. बाहेरचा उमेदवार दिल्यामुळे नाना पटोले यांची गाडी स्थानिक इच्छुक उमेदवारांनी रोखून धरली होती. यावेळी कार्यकर्त्यांनी पटोले यांच्याजवळ प्रचंड रोष व्यक्त केला.

स्थानिक उमेदवारांनी काय चूक केली? असा सवाल यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी विचारला. अनेक कार्यकर्ते नाना पटोले यांच्या ताफ्यासमोर आडवे झाले होते. दरम्यान पोलिसांनी मध्यस्थी करत कार्यकर्त्यांना बाजूला सारत पोलिसांनी नाना पटोले यांना सभास्थळापर्यंत नेले.

# सोलापुरातील शिंदे सेना फुटली पदाधिकाऱ्यांचा ‘स्वराज्य’ प्रवेश

✔ सोलापूर/प्रतिनिधी

भाजपच्या राजकारणाला कंटाळून आणि शिवसेनेच्या नरमाईच्या भूमिकेमुळे अखेर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत छत्रपती संभाजी राजे यांच्या स्वराज्य पक्षात प्रवेश केला. यामुळे सोलापुराती शिंदे सेना पुरतील फुटली आहे.

जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, जिल्हाप्रमुख मनीष काळजे, शहरप्रमुख मनोज शेजवाल, युवासेना प्रमुख उमेश गायकवाड यांनी छत्रपती संभाजी राजे यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केला असून ते मंगळवारी विधानसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज भरणार आहेत. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या सर्वच पदाधिकाऱ्यांना सांभाळून घेत ताकद दिली.



करोडे रूपयांचा निधी या पदाधिकाऱ्यांना दिला आहे. परंतु ऐनवेळी याच नेत्यांनी आपले नेते एकनाथ शिंदे यांची साथ सोडली आहे. आताही नेतेमंडळी सोलापूर शहरातील विधानसभा मतदारसंघात आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे समजते.

### राजकीय कारकिर्दीत मोठी रिस्क

शहर मध्य मधून मनीष काळजे, शहर उत्तर मधून अमोल बापू शिंदे, दक्षिणमधून उमेश गायकवाड हे उमेदवार असून यांनी एबी फॉर्म घेतला आहे. मंगळवारी सकाळी उमेदवारी फॉर्म भरणार आहेत, अशी माहिती आहे. या नेत्यांनी राजकीय कारकीर्दीत मोठी रिस्क घेतल्याची चर्चा आहे.



# राऊत विरुद्ध पाटकरांचा आता थेट संघर्ष

## स्वप्ना पाटकर निवडणुकीच्या मैदानात

✔ मुंबई/प्रतिनिधी

शिवसेना ठाकरे गटाचे नेते, खासदार संजय राऊत आणि चित्रपट निर्मात्या, व्यावसायिक स्वप्ना पाटकर यांच्या संघर्षाचा दुसरा अंक सुरू होणार आहे. हा संघर्ष आता निवडणुकीच्या मैदानात होणार आहे. संजय राऊत यांचे बंधू ठाकरे गटाचे आमदार सुनिल राऊत यांच्या विरोधात स्वप्ना पाटकर निवडणूक लढवणार आहेत. विक्रोळी मतदारसंघातून स्वप्ना पाटकर निवडणूक लढवणार आहे. पत्राचाळ, खिचडी कंत्राट यासारख्या आपण केलेल्या भ्रष्टाचारावर भाष्य होऊ नये यासाठी साक्षीदारांना अत्याचाराच्या धमक्या देणाऱ्या घाबरट आणि पळकुट्या लोकांशी आता मी थेट दोन हात करणार अससल्याचे स्वप्ना पाटकर यांनी म्हटले.

पत्राचाळ पुनर्विकास घोटाळा प्रकरणात ईडीने संजय राऊत यांना अटक केली होती. या प्रकरणात संजय राऊत सध्या जामिनावर आहेत. ईडी चौकशी स्वप्ना पाटकर यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे तपास यंत्रणेने राऊतांवर कारवाई केली. ईडी चौकशी सुरू असताना संजय राऊत यांनी आपल्याला धमकावले असल्याचा आरोपही स्वप्ना पाटकर यांनी केला होता. पाटकर यांना राऊतांनी कथित शिवीगाळ आणि धमकी दिल्याची ऑडिओ क्लिपही व्हायरल झाली होती. स्वप्ना पाटकर यांनी ईडीला पत्र लिहुन आपल्याला धमकी मिळत असल्याची तक्रार पत्राद्वारे केली. या प्रकरणातील आरोपी आणि त्याचे गुंड मला सतत धमकावत आहेत आणि यात इतर लोकांचाही सहभाग असू शकतो. मला सतत धमक्या दिल्या जात आहेत. तपासादरम्यान दिलेले वक्तव्य बदलण्यासाठी दबाव आणला जात असल्याचे पाटकर यांनी म्हटले. स्वप्ना पाटकर यांनी आता विक्रोळी मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. या मतदारसंघातून संजय राऊत यांचे बंधू सुनिल राऊत आमदार आहेत. सुनिल राऊत यांनी आजच आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

### स्वप्ना पाटकरांनी काय म्हटले?

स्वप्ना पाटकर यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटले की, सत्यमेव जयते! स्त्री दुर्गा असते लक्ष्मी असते. तिचा सन्मान करता येत नाही त्यांना आयुष्यात काहीच नीट करता येत नाही. माझा लोकशाही आणि न्यायालयावर प्रचंड विश्वास आहे. लोकशाही मार्गाने लोकशाहीच्या महोत्सवात विक्रोळी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढण्यासाठी उमेदवारी अर्ज घेत आहे. भ्रष्टाचार, महिला सुरक्षा, शासन-प्रशासनाबाबत रोज सकाळी भोंगे वाजवणारे लोक स्वत: कुपमंडूक वृत्तीचे आहेत. महिलांचा सन्मान आणि त्यांची सुरक्षितता यावर त्यांची अत्यंत गंभीर मते आहेत. मात्र प्रत्यक्षात एका महिलेचे शोषण करण्यापर्यंत त्यांची मजल गेली असल्याचे पाटकर यांनी म्हटले.